महाराष्ट्र शासन
**शासकीय विधी महाविद्यालय**
'ए' रोड चर्चगेट, मुंबई- ४०००२०

दूरध्वनी क्र.- ०२२-२२०४१७०७ ई- मेल- principal@glcmumbai.com

क्रमांक/शाविम/आस्था/२०२६/ 7020 दिनांक- 27/8/2026

**कार्यालयीन परिपत्रक :-**

**विषय :** सन २०२६ या वर्षातील स्थानिक सुट्टीबाबत - रक्षाबंधन.

**संदर्भ :** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन शुद्धीपत्रक क्र. स्थानिसु-२०२६/प्र.क्र.१४०/ जपुक (२९), दिनांक १० ऑगस्ट २०२६.

उपरोक्त संदर्भीय शासन शुद्धीपत्रकान्वये मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील सर्व राज्य शासकीय व निमशासकीय कार्यालयांना लागू असलेल्या स्थानिक सुट्ट्यांच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे. त्यानुषंगाने, शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई येथील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांना याद्वारे खालीलप्रमाणे सूचित करण्यात येत आहे :-

१. पूर्वीच्या परिपत्रकानुसार शनिवार, दिनांक **०५ सप्टेंबर २०२६** रोजी जाहीर करण्यात आलेली **'गोपाळकाला (दहीहंडी)'** ही स्थानिक सुट्टी रद्द करण्यात आली आहे.

२. त्याऐवजी शुक्रवार, दिनांक **२८ ऑगस्ट २०२६** रोजी **'रक्षाबंधन'** या सणानिमित्त शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई यांना **स्थानिक सुट्टी** जाहीर करण्यात येत आहे.

३. शनिवार, दिनांक **०५ सप्टेंबर २०२६** रोजी महाविद्यालय नेहमीप्रमाणे नियमित वेळेत **पूर्णवेळ सुरू राहील.**

वरीलप्रमाणे करण्यात आलेल्या स्थानिक सुट्टीतील बदलाची सर्व संबंधित प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी व त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

A A Vaidya 27/08/26

डॉ. अस्मिता वैद्य
प्राचार्य
शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई

**प्राचार्य**
**शासकीय विधी महाविद्यालय**
**'अे' मार्ग, चर्चगेट, मुंबई-२०**

Scanned with OKEN Scanner

सन २०२६ या वर्षातील गोपाळकाला (दहीहंडी) यासणाऐवजी रक्षाबंधन या सणास स्थानिक सुट्टी जाहीर करणेबाबत..

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन शुद्धीपत्रक क्रमांक: स्थानिसु-२०२६/प्र.क्र.१४०/जपुक (२९)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक: १० ऑगस्ट, २०२६

संदर्भ: शासन परिपत्रक क्र: सार्वसु-११२५/प्र.क्र.१९९/जपुक (२९), दि.०९ डिसेंबर, २०२५

शासन शुद्धीपत्रक:

उपरोक्त संदर्भाधीन शासन परिपत्रक दिनांक ०९ डिसेंबर, २०२५ मधील परिच्छेद १ येथील

| अ.क्र. | सुट्टीचा दिवस | इंग्रजी तारीख | भारतीय सौर दिनांक | वार |
|---|---|---|---|---|
| १ | गोपाळकाला (दहिहंडी) | ०५ सप्टेंबर, २०२६ | १४ भाद्रपद, शके १९४८ | शनिवार |

याऐवजी

| अ.क्र. | सुट्टीचा दिवस | इंग्रजी तारीख | भारतीय सौर दिनांक | वार |
|---|---|---|---|---|
| १ | रक्षाबंधन | २८ ऑगस्ट, २०२६ | ६ भाद्रपद, शके १९४८ | शुक्रवार |

असे वाचावे

२. हे आदेश मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील राज्य शासकीय / निमशासकीय कार्यालयांना लागू राहतील.

३. वरील स्थानिक सुट्टी शासन निर्णय क्र. पी. ॲन्ड एस. डी. नंबर पी-१३-दोन-बी, दिनांक ५ नोव्हेंबर, १९५८ मधील तरतुदीनुसार जाहीर करण्यात येत आहे.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक .................. असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(रामदास कोळेकर)
शासनाचे अवर सचिव

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, लोकभवन, मुंबई.
२. मा. राज्यपाल यांचे परिवार प्रबंधक, लोकभवन, मुंबई.
३. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास व गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

C:\Users\Ghansham.Jadhav\Desktop\Nilesh Harad\स्थानिक सुट्टी.docx

Scanned with OKEN Scanner